नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ७३ Issue - 73 | वार बुधवार दि. ३० जुलै २०२५ Blow- Wednesday Date 30 Jully 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# कोणत्याही देशाने ऑपरेशन सिंदूर रोखले नाही


## पंतप्रधान मोदी; भारताला जगभरातून समर्थन, पण काँग्रेसचं समर्थन मिळालं नाही, पाकिस्तानने युद्ध थांबवण्याची विनंती केली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : पहलगाम हल्ल्यानंतर त्याचा बदला आम्ही घेतला, २२ एप्रिलच्या हल्ल्याचा बदला भारतीय सैन्याने २२ मिनिटात घेतला आणि दहशतवाद्यांना गाढलं असा पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले. भारतीय सैन्याने केलेल्या हल्ल्यामुळे त्यांना पोसणाऱ्या आकांची आजही झोप उडाली असं नरेंद्र मोदी म्हणाले. पहलगाम हल्ल्यानंतर भारताने सिंधू पासून ते सिंधूरपर्यंत हल्ला करत पाकिस्तानला धडा शिकवला असं नरेंद्र मोदी म्हणाले.

पहलगामवरील हल्ला म्हणजे भारताला हिंसेचा खाईत लोटण्याचं आणि देशात दंगे करण्याचा प्रयत्न होता. पण देशवासियांच्या एकीमुळे तो प्रयत्न फसला. आम्ही दहशतवाद्यांना मातीत गाढणार असा संकल्प मी त्यावेळी केला होता. या हल्ल्याची सजा दहशतवाद्यांना आणि त्यांना पोसणाऱ्यांना मिळणार. २२ एप्रिल रोजी हा हल्ला झाल्यानंतर मी परदेशातून लागोलाग आलो. त्या दिवशी एक बैठक बोलावली आणि दहशतवाद्यांना प्रत्युत्तर देणार असा निश्चय केला.

आमच्या सैन्यबलाच्यासंकल्पावर पूर्ण विश्वास आहे. त्यांना कारवाईसाठी पूर्ण मोकळीक दिली. त्यांनीच ठरवावं की कुठे आणि कधी हल्ला करायचा, सैन्याला सर्व अधिकार दिले. त्यानंतर सैन्याने अशी कारवाई केली की त्यामुळे दहशतवाद्यांना पोसणारे आजही थरथरतात.



भारतीय सैन्याने केलेल्या हल्ल्यामुळे पाकिस्तानी एअरबेस आजही आयसीयूमध्ये आहेत. ऑपरेशन सिंदूरमध्ये भारतीय सैन्याने त्यांची ताकद दाखवली. पाकिस्तानने दिलेल्या न्यूक्लिअर धमक्यांना भारताने भीक घातली नाही.

या आधी दहशतवाद्यांना पोसणारे निश्चित असायचे. एखादा हल्ला केला तर त्या मागचे आका निवांत असायचे. पण आता त्या आकांना झोप येत नाही. त्यांना माहिती आहे, असं काही केलं तर भारत येईल आणि त्यांना सोडणार नाही. सिंधू पासून ते सिंदूरपर्यंत भारताने कारवाई केली आणि पाकिस्तानी दहशतवाद्यांना धडा शिकवला.

भारताच्या ऑपरेशन सिंदूरनंतर केवळ तीन देशांनी पाकिस्तानला पाठिंबा दिला. तर भारताच्या बाजूने जगभरातून पाठिंबा मिळाला. जगभरातून समर्थन मिळालं पण माझ्या देशातील विरांना काँग्रेसचं समर्थन मिळालं नाही हे दुर्दैव.

पहलगामच्या हल्यानंतर मोदींची ५६ इंच छाती कुठे गेली असा प्रश्न विचारण्यात आला. दहशतवादी हल्ल्यानंतरही काँग्रेसने राजकारण केलं. काँग्रेसच्या स्वार्थी राजकारणामुळे देशाच्या सैन्यबलाचे मनोबल कमी होत होतं. काँग्रेसला ना भारताच्या समार्थ्यावर विश्वास आहे ना भारतीय सैन्यावर.

भारताचे ध्येय निश्चित, ते पूर्ण केलं

१० मे रोजी भारताने ऑपरेशन सिंदूर स्थगित करण्याची घोषणा केली. पण इथल्या काही लोकांनी सैन्यावर विश्वास न दाखवता अफवा पसरवण्यावर भर दिला.

सर्जिकल स्ट्राईकवेळीही असंच घडलं. त्यावेळी भारतीय सैन्याने पाकिस्तानमधील लष्करी तळं उद्धवस्त केली. बालाकोट एअर स्ट्राईकवेळीही दहशतवाद्यांच्या ट्रेनिंग सेंटरवर कारवाई केली, ते नष्ट केलं. ऑपरेशन सिंदूरवेळीही लक्ष्य निश्चित होतं. दहशतवाद्यांना ज्या ठिकाणाहून मदत मिळाली, ज्या ठिकाणी योजना तयार करण्यात आली त्या ठिकाणी हल्ला करण्यात आला.

२ मेच्या मध्यरात्री आणि १० मेच्या पहाटे, भारतीय सैन्याने पाकिस्तानच्या अनेक तळांवर हल्ले केले. भारतीय सैन्याने असा हल्ला केला की पाकिस्तानने त्याचा विचारही केला नव्हता. त्यामुळे पाकिस्तान गुडघ्यावर आले. त्यावेळी पाकिस्तानचा पहिला फोन आला. डीजीएमओला पाकिस्तानकडून फोन आला आणि भारताला हल्ले थांबवण्याची विनंती केली.

ट्रम्प यांनी मध्यस्ती केल्याचं फेटाळलं

आमचा हल्ला निश्चित होता, आमचे ध्येय निश्चित होतं. भारताने ते लक्ष्य पूर्ण केलं. त्यानंतर भारताने ऑपरेशन सिंदूर स्थगित केलं. जगातल्या कोणत्याही नेत्याने हा हल्ला थांबवण्यासाठी विनंती केली नाही हे मी जबाबदारीने सांगतोय.

९ मे रोजी अमेरिकेचे उपराष्ट्रपती हे सातत्याने मला फोन करत होते. तीन-चार वेळा फोन केल्यानंतर मी त्यांच्याशी संवाद साधला. त्यांनी सांगितलं की, पाकिस्तान मोठा हल्ला करण्याच्या तयारीत आहे. त्यावेळी मी त्यांना म्हणालो की, असं जर झालं तर पाकिस्तानला मोठी किंमत मोजावी लागेल. भारत त्यापेक्षाही मोठा हल्ला करेल. आम्ही गोळीला उत्तर गोळीने देणार.

काँग्रेस पाकिस्तानवर निर्भर होत चाललंय

पाकिस्तानने जर यापुढे असं काही केलं तर त्याला उत्तर दिलं जाईल. आजचा भारत हा आत्मविश्वासाने भरला आहे. आजचा भारत हा आत्मनिर्भर आहे. एकीकडे भारत गतीने पुढे जात आहे, पण दुसरीकडे काँग्रेस मतांसाठी पाकिस्तानवर निर्भर होत आहे. काँग्रेसकडून राजकारणासाठी जनतेमध्ये अविश्वास निर्माण केला जात आहे.

सैन्याला विरोध हा काँग्रेसचा इतिहास

सातत्याने भारतीय सैन्याच्या काम गिरीवर काँग्रेसने अविश्वास दाखवला आहे. देशाने नुकताच कारगिल विजय दिवस साजरा केला. पण काँग्रेसने कधीही कारगिर विजय दिवस साजरा केला नाही. ज्या वेळी डोकलाममध्ये भारतीय सैन्य धाडस दाखवत होतं, त्यावेळी काँग्रेसचे नेते कुणाकडून छुपी माहिती घेत होते हे सगळ्यांनाच माहिती आहे. आताही काँग्रेसने पाकिस्तानला क्लीन चिट दिली. पहलगामच्या हल्ल्यामागे पाकिस्तान असल्याचा पुरावा काँग्रेस मागत आहे. नेमकी हीच मागणी पाकिस्तान करत आहे. आज ज्यावेळी त्यांना सगळे पुरावे दिले तर त्यांची अवस्था बिथरल्यासारखी झाली आहे.

काँग्रेसने पाकिस्तानने केलेले खोटे दावे पसरवले

भारतीय एअर डिफेन्स सिस्टिमने पाकिस्तानी ड्रोन नष्ट केले. ९ मे रोजी पाकिस्तानने एक हजार ड्रोन मिसाईलच्या माध्यमातून भारतावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. हे मिसाईल भारताच्या कोणत्याही ठिकाणी पडू शकत होते. पण ते सर्व मिसाईल भारताने हवेतच नष्ट केले. भारतीयांना याचा अभिमान वाटला. पण काँग्रेसने पाकिस्तानने केलेले खोटे दावे पसरवण्याचा प्रयत्न केला.

पाकव्याप्त काश्मीर कुणाच्या काळात पाकिस्तानने घेतला?

विकासासाठी आम्ही सामरिक सामर्थ्याचा वापर करत आहोत. राष्ट्रीय सुरक्षेसंबंधी काँग्रेसकडे आधीही धोरण नव्हते, यापुढेही नसेल. पाकव्याप्त काश्मीर का घेतलं नाही असा प्रश्न ते करतात. पण पाकव्याप्त काश्मीर हे पाकिस्तानच्या ताब्यात कुणाच्या काळात गेलं?

१९६२ आणि १९६३ च्या दरम्यान, काँग्रेसचे नेते हे किशनगंगा, नीलम व्हॅली आणि काही परिसर पाकिस्तानला देण्याचा प्रस्ताव मांडत होते. १९६६ मध्ये रण ऑफ कच्छच्या मुद्द्यावर काँग्रेसने मध्यस्तीचा प्रस्ताव स्वीकारला. १९६५ च्या युद्धात

(पान २ वर...)

# ‘ई-नाम’ योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अधिनियमात सुधारणेस मान्यता

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील शेतकऱ्यांना शेतमालाला रास्त व वाजवी भाव मिळावा यासाठी ‘ई-नाम’ योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार आहे. त्याअंतर्गत राष्ट्रीय नामांकित बाजारतळ स्थापन करणे सुलभ व्हावे यासाठी महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ मध्ये सुधारणा करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

**शेलमालास रास्त भाव मिळण्यासाठी राष्ट्रीय नामांकित बाजारतळ स्थापन करणे सुलभ होणार**

केंद्र व राज्य शासन, कृषि उत्पन्न बाजार समितीतील कृषि उत्पन्नाच्या व्यापारामधील अडसर कमी व्हावे यासाठी राज्यातील १३३ कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये ई-नाम योजना राबवित आहे. कृषि उत्पन्नाच्या व्यापारासाठी ऑनलाईन पद्धती कार्यान्वित करीत आहे. पण अजूनही राज्यात ई-नाम अंतर्गत सिंगल युनिफाइड लायसन्सची तरतूद नसल्याने, इंटरमंडी व इंटर स्टेट ट्रेड सुरु होऊ शकलेले नाहीत. दरम्यान, केंद्र शासनाच्या कृषि व शेतकरी कल्याण विभागाने कृषि उत्पन्न आणि पशुधन पणन (प्रचालन व सुविधा) अधिनियम, २०१७ (मॉडेल ॲक्ट) प्रकाशित केला आहे. या अनुषंगाने राज्याच्या महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ मध्ये सुधारणा करण्यासाठी सन २०१८ च्या हिवाळी अधिवेशनात विधेयक मांडण्यात आले होते. विधेयकातील तरतुदींबाबत सुधारणांसाठी मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन करण्यात आली होती. या उपसमितीने सुधारणांची शिफारस केली आहे. त्यानुसार केंद्राच्या मॉडेल ॲक्ट मधील तरतुदीनुसार राज्यातील ज्या मोठ्या बाजार समित्यांकडे अन्य किमान २ राज्यांतून शेतमाल येतो, अशा बाजार समित्यांना राष्ट्रीय नामांकित बाजार समित्या घोषित करण्याची तरतूद करण्यात येणार आहे. अशा बाजार समित्या राष्ट्रीय



नामांकित बाजार समित्या घोषित केल्यानंतर या बाजार समित्यांवर शासनाचे थेट नियंत्रण होऊन निर्णय प्रक्रिया व पणन प्रक्रिया सुलभतेने व वेगाने होणार आहे. याशिवाय केंद्र शासनाच्या सदर मॉडेल ॲक्ट २०१७ नुसार सिंगल युनिफाइड लायसन्स संदर्भातील तरतुदींचा समावेश करण्याची शिफारस करण्यात आली आहे. तसेच कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या सचिवांचे केडर तयार करण्याची शिफारस करण्यात आली आहे. जेणेकरून सचिव हा या कार्यालयाच्या थेट नियंत्रणाखाली येऊन शासन व बाजार समिती यामधील दुवा म्हणून तो काम करेल, तसेच कृषि उत्पन्न बाजार समित्यांवर देखील प्रभाव नियंत्रण ठेवता येईल. यासाठी सचिवाला पर्यवेक्षणाबाबतचे कामकाज सोपविले जाणार आहे सदर सचिवांचे पगार देखरेख शुल्कामधून जमा होणाऱ्या रकमेमधून करण्यात येणार आहे. याकरिता कृषि उत्पन्न बाजार समित्यांकडून आकारण्यात येणारी देखरेख शुल्काची रक्कम शासनाऐवजी पणन विभागाला सुपूर्द करावी, अशी सुधारणाही अधिनियमात करण्यात येणार आहे. या अधिनियमातील सुधारणांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी स्थानिक स्तरावर सनियंत्रण समिती स्थापन करण्यासही मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

**२९० कोटी ३३ लाख रुपयांची तरतूद** | **राज्य मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता**

# राज्यात ‘मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान’ राबविणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषदांसाठी सन २०२५-२६ या आर्थिक वर्षापासून तालुका, जिल्हा, महसूल विभाग व राज्य अशा चार स्तरांवर ‘मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान’ हे पुरस्कार अभियान राबविण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. तसेच या अभियानातील पुरस्कारांकरिता दरवर्षी २९० कोटी ३३ लाख रुपयांची तरतूद करण्यास मान्यता देण्यात आली. या अभियानात १ हजार ९०२ पुरस्कार दिले जाणार असून अभियानाचा कालावधी १७ सप्टेंबर, ते ३१ डिसेंबर, २०२५ असा राहणार आहे. ग्रामपंचायतीसाठी राज्यस्तरावर प्रथम क्रमांकासाठी ५ कोटी रुपये, द्वितीय क्रमांकासाठी ३ कोटी रुपये आणि तृतीय क्रमांकासाठी २ कोटी रुपयांचा पुरस्कार देण्यात येणार आहे. तर विभागस्तरीय पुरस्कारात विभागनिहाय पहिल्या ३ ग्रामपंचायती अशा एकूण १८ ग्रामपंचायतींना अनुक्रमे १ कोटी, ८० लाख आणि ६० लाख रुपयांचा पुरस्कार देण्यात येणार आहे. जिल्हास्तरासाठी ३४ जिल्ह्यातील एकूण १०२ ग्रामपंचायतींना अनुक्रमे प्रथम क्रमांकासाठी ५० लाख, द्वितीयसाठी ३० लाख आणि तृतीयसाठी २० लाख रुपयांचा पुरस्कार देण्यात येणार आहे. तालुकास्तरावर (१०५३ पुरस्कार) ग्रामपंचायतीला प्रथम क्रमांकासाठी १५ लाख, द्वितीय क्रमांकासाठी १२ लाख, तृतीय क्रमांकासाठी ८ लाख रुपये अशा एकूण १ हजार ५३ ग्रामपंचायती आणि ५ लाख रुपयांचे दोन विशेष पुरस्कार (७०२ पुरस्कार) देण्यात येणार आहेत.

पंचायत समितीसाठी राज्यस्तरावर प्रथम क्रमांकासाठी २ कोटी रुपये, द्वितीय क्रमांकासाठी दीड कोटी रुपये आणि तृतीय क्रमांकासाठी १ कोटी २५ लाख रुपयांचा पुरस्कार देण्यात येणार आहे. तर विभागस्तरावर (१८ पुरस्कार) प्रथम क्रमांकासाठी १ कोटी रुपये, द्वितीय क्रमांकासाठी ७५ लाख रुपये आणि तृतीय क्रमांकासाठी ६० लाख रुपयांचा पुरस्कार देण्यात येणार आहे. जिल्हा परिषदेसाठी राज्यस्तरावर प्रथम क्रमांकासाठी ५ कोटी रुपये, द्वितीय क्रमांकासाठी ३ कोटी रुपये आणि तृतीय क्रमांकासाठी २ कोटी रुपयांचा पुरस्कार देण्यात येणार आहे.

या अभियानाच्या अंमलबजावणी व संनियंत्रणासाठी राज्यस्तरावर ग्राम विकास व पंचायतराज मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली १६ सदस्यांची समिती स्थापन करण्यात येणार आहे. या अभियानाची पूर्वतयारी १ ऑगस्टपासून सुरु होणार आहे. या अभियान पुरस्कारासाठी निवड करण्याकरिता तालुका, जिल्हा व राज्यस्तरावर मूल्यमापनासाठी समित्या स्थापन करण्यात येतील. तसेच अभियानाची प्रभावी अंमलबजावणी व्हावी, यासाठी विभाग, जिल्हा व पंचायत समिती स्तरावर संनियंत्रण व मूल्यमापन यंत्रणा समिती काम करणार आहे. या अभियांनाच्या प्रत्येक टप्प्यावरील मूल्यमापनासाठी कार्यपध्दती व वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे.

या अभियानात सात मुख्य घटक आहेत. यात सुशासनयुक्त पंचायत, सक्षम पंचायत, जल समृद्ध, स्वच्छ व हरित गाव, मनरेगा व इतर योजनांची सांगड, गावपातळीवरील संस्थांचे सक्षमीकरण, उपजीविका विकास व सामाजिक न्याय, लोकसहभाग व श्रमदान माध्यमातून लोकचळवळ अशा घटकांचा समावेश आहे. या घटकांच्या आधारे गुणांकन करुन पुरस्कारासाठी निवड केली जाणार आहे.

# सरकारच्या उदासीन धोरणामुळे शेतकऱ्यांचा आत्महत्या : रोहित पवार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी

चिखली तालुक्यातील मौजे भरोसा येथे शेतकरी दापते यानी एकाच वेळी गळफास घेऊन आत्महत्या केली होती त्यामुळे शासन आम्ही शेतकऱ्यांना मदत करतो याच्यावरचा पडदा टराटरा फाडला आहे शेतकरी कोणत्या परिस्थितीमध्ये जगत आहे. हे सर्वसामान्य जनतेला कळले आहे जर शेतकरी एकाच वेळेस पती आणि पत्नी दोन्ही जर आत्महत्या करत असेल तर ते किती अडचणीत असतील या गोष्टींचा आपण विचार सुद्धा करू शकत नाही रोहित पवार हे आत्महत्याग्रस्त कुटुंबियांच्या सांत्वन पर भेटीसाठी भरोसा येथे आले असते त्यांनी शेतकऱ्या प्रति असलेली आपली आपुलकी आणि शेतकऱ्यांना न्याय कसा मिळेल याविषयी आत्महत्याग्रस्त कुटुंबीय यांच्याशी चर्चा करून त्यांच्या ज्या अडचणी आहे त्यावर बुलढाणा जिल्हाधिकारी डॉक्टर किरण पाटील तहसीलदार संतोष काकडे व गटविकास अधिकारी समाधान वाघ यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा करून या कुटुंबाच्या ज्या अडचणी आहेत. त्या लवकरात लवकर कशा सोडवायच्या याकडे लक्ष वेधले तसेच सर्व शेतकऱ्यांना भेट दिली असता आत्महत्या हि काही या वर पर्याय नाही या जुलमी सरकारशी दोन हात करण्याची तयारी ठेवा हे सरकार शेतकऱ्याचे नसून अडाणी अंबानी ग्रुप यांचे आहे. या सरकारला शेतकऱ्यांच्या किती आत्महत्या झाल्या तरी यांना कोणत्याही प्रकारचे सोयरसुतुक नाही यावेळी राष्ट्रवादी जिल्हाध्यक्ष रेखाताई खेडेकर नरेश शेळके ज्योतीताई खेडेकर राष्ट्रवादी शरद चंद्र पवार गटाचे जिल्हा उपाध्यक्ष गजानन वायाळ बाळाभाऊ पवार बरेच राष्ट्रवादीचे शरद चंद्र पवार गटाचे नेते हजर होते यावेळी आत्महत्याग्रस्त कुटुंबीयांना गजानन वायाळ व बाळाभाऊ पवार यांनी रोहित पवार यांच्या माध्यमातून ५१ हजार रुपयांची आर्थिक मदत आत्महत्याग्रस्त कुटुंबीयांना दिला आहे आज या कुटुंबाला आर्थिक मदतीची गरज आहे त्यामुळे हे आळखून राष्ट्रवादी शरद चंद्र पवार गटाचे




जिल्हा उपाध्यक्ष गजानन वायाळ यांनी क्षणाचा ही विलंब न लावता ५१ हजार रुपयांचा चेक आत्महत्याग्रस्त कुटुंबे यांच्या नातेवाईकाकडे दिला आहे यावेळी रोहित पवार यांन शेतकऱ्यांच्या शाळेतील लहान मुलीशी संवाद साधला असता करी परिस्थिती काय आहे हे रोहित पवार यांच्या लक्षात आणून दिले आहे वर्ग आठवी मधील विद्यार्थिनी रोहित पवार यांची भेट घेतली असता आज शेतकरी कोणत्या आसमानी आणि सुलतानी संकटाशी लढत आहे त्याची जाणीव करून दिली आहे. यावर रोहित पवार यांनी सांगितलं मी जर निर्णय घेतला असता तर मंत्री झालो असतो परंतु मला शेतकऱ्याच्या अडचणीची जाण आहे त्यामुळे मी संघर्ष करण्याच्या तयारीत आहे आणि शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्याच्या भूमिकेत आहे. लहान मुलींनी शेतकऱ्याची काय परिस्थिती आहे हे सर्वांना दाखवून दिले गजानन थुटे यांच्या मुलीने ज्यावेळेस सांगितलं की आम्ही आमच्या बापाकडे वही पेना साठी पैसे मागतो तर आमच्या बापाकडे वही व पेना साठी आमच्या शेतकरी बापाकडे पैसे नसतात यावरून आमचं दुर्दैव आहे का आम्ही शेतकऱ्यांच्या पोटी जन्म घेतला (पान २ वर..)

## संपादकीय....

### पंतप्रधान आक्रमक

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाकिस्तानने ९ मे च्या रात्री भारतावर केलेल्या मोठ्या हल्ल्याबाबत एक मोठा उलगडा केला आहे. संसदेत ऑपरेशन सिंदूरवरील चर्चेदरम्यान मोदी म्हणाले की, त्या रात्री पाकिस्तानने १००० क्षेपणास्त्रे आणि ड्रोनने भारतावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला होता. परंतु भारतीय सैन्याने आपल्या कौशल्याने पाकिस्तानची प्रत्येक चाल हाणून पाडली. ऑपरेशन सिंदूरवरील चर्चेदरम्यान पंतप्रधान मोदींनी एक मोठा खुलासा केला आहे. ९ मे रोजी पाकिस्तानने सुमारे १००० क्षेपणास्त्रे आणि ड्रोनने भारतावर मोठा हल्ला करण्याचा प्रयत्न केला होता. जर ही क्षेपणास्त्रे भारताच्या कोणत्याही भागावर पडली असती, तर तिथे भयानक विनाश झाला असता. परंतु, भारताने ती आकाशातच उद्ध्वस्त केली. पाकिस्तानची कोणतीही चाल भारतीय सैन्यापुढे यशस्वी होऊ शकली नाही. देशातील प्रत्येक नागरिकाला याचा अभिमान आहे. पण, जणू काही काँग्रेसचे लोक वाट पाहत होते की काहीतरी चूक होईल, मोदी मरतील, ते कुठेतरी अडकतील. पाकिस्तानने आदमपूर एअरबेसवर हल्ला करणार असल्याचं पसरवलं. त्यांनी खोटे बोलण्याचा पुरेपूर प्रयत्न केला. मी दुसऱ्याच दिवशी आदमपूरला पोहोचलो आणि स्वतः त्यांचं पितळ उघडं पाडलं, तेव्हाच त्यांना जाणीव झाली की आता हे खोटे चालणार नाही, असंही मोदी म्हणाले. काँग्रेस पक्षाने या देशावर बराच काळ राज्य केले, त्यांना शासनव्यवस्थेची पूर्ण माहिती आहे. त्यानंतरही त्यांनी परराष्ट्र मंत्रालयाचे उत्तर स्वीकारले नाही,

## सरकारच्या उदासीन धोरणामुळे शेतकऱ्यांचा आत्महत्या : रोहित पवार

(पान १ वरून..)

हेच आमचे दुर्दैव आहे का त्यावेळी सर्वांच्याच मनावर हे वाक्य आधी राज्य करून गेले आहे यावरून शेतकरी किती दयनीय अवस्थेत आहे हे लक्षात येत आहे आज सरकार हे शासकीय शाळा बंद करण्याच्या मार्गावर आहे त्यामुळे येणारे भविष्यकाळात शेतकऱ्यांच्या मुलांनी शिकाव कि नाही हा प्रश्न सुद्धा लहान मुलीच्या तोंडातुन या वेळेस निघाला त्यावेळेस शिक्षणाचा महत्त्व शेतकऱ्याच्या मुलांना आहे हे सुद्धा लक्षात आले आहे या यावेळी रोहित पवार यांनी त्यांच्या बारामती येथील शारदा विद्यालयांमध्ये सदर मुलीचे अकरावी बारावीच्या शिक्षणाचे जबाबदारी घेतली आहे यामुळे यावरून पवार हे किती हळव्या मनाचे नेते आहेत आणि शिक्षणा प्रति आपुलकी आहे हे लक्षात येते राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे जिल्हा उपाध्यक्ष गजानन वायाळ यांनी रोहित पवार यांना बाप माणूस हे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे यावेळी पुस्तक भेट म्हणून दिली आहे.

# आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांच्या विशेष प्रयत्नांतून सांगोला तालुक्यातील ५ ग्रामपंचायतींना इमारत निधी मंजूर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



सांगोला: ग्रामपंचायत प्रशासनाचा कार्यभार व्यवस्थित पार पाडण्यासाठी ग्रामपंचायतींना नवीन इमारतीची आवश्यकता होती. सांगोला विधानसभा मतदारसंघातील जुनोनी,घेरडी,आलेगाव वासूद आणि पाचेगाव बु या पाच ग्राम पंचायतींना पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानांतर्गत नविन ग्रामपंचायत इमारत बांधण्यासाठी प्रत्येकी २५ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या मागणीला यश मिळाले आहे.

ग्रामपंचायतीचे पदाधिकारी व प्रशासकीय अधिकार्यांना गावचा कारभार पाहताना येणार्या अडचणी दूर व्हाव्या, यासाठी मतदार संघातील ५ ग्रामपंचायत कार्यालयांच्या नूतन इमारतीसाठी आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी प्रत्येकी २५ लाख रुपयांचा निधी मिळवून दिला आहे.

मतदार संघाच्या सर्वांगिण विकासाला गती देवून, शासकीय कार्यालयांचा देखील विकास करण्यावर आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी भर दिला आहे. यामुळे प्रशासकीय अधिकार्यांची मोठी अडचण दूर होवून, नागरिकांना सेवा मिळण्याची सुविधा निर्माण झाली आहे.

**शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची यशस्वीपणे अंमलबजावणी करणार्या ग्राम पंचायतींना स्वतंत्र, सूसज्ज कार्यालयीन इमारत मिळावी. नागरिकांना चांगली सेवा मिळावी, या उद्देशातून आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी शासनाकडे पाठपुरावा केला होता.**

महाराष्ट्र राज्य ग्रामविकास तथा पंचायतराज मंत्री व सोलापूर जिल्हा पालकमंत्री मा.श्री. जयकुमारजी गोरे यांच्या कडे आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी ग्रामपंचायतींना इमारत बांधण्यासाठी निधी उपलब्ध करून द्यावा ही मागणी अधिवेशनापूर्वी केली होती. या मागणीची दखल घेत ग्रामविकास मंत्री मा.ना.जयकुमार गोरे यांनी तत्काळ या ग्रामपंचायतींना पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानांतर्गत निधी मंजूर केला असून निधी मंजूर केल्याबद्दल आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी मंत्री महोदयांचे आभार मानले.

ग्रामपंचायतींच्या नूतन इमारतींना प्रशासकीय मान्यता मिळाल्यामुळे नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. निधी मंजूर केल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, यांच्यासह ग्रामविकास मंत्री तथा सोलापूर जिल्हा पालकमंत्री मा.ना.जयकुमार गोरे यांचे आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी आभार मानले.

## हन्नूर येथील अनंत चैतन्य उच्च माध्यमिक प्रशालेत इ. ११ वी च्या विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

हन्नूर : महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था अक्कलकोट संचलित अनंत चैतन्य माध्य. व उच्च माध्यमिक प्रशाला, हन्नूर येथे इ. ११ वी च्या नवोगत विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव कार्यक्रम अतिशय उत्साही वातावरणात आज संपन्न झाला. प्रारंभी प्रशालेचे प्राचार्य श्री. अशोक साखरे यांच्या हस्ते संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कै. आदरणीय पंचप्पा कल्याणशेट्टी सर यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. यानंतर इ. अकरावीत प्रवेश घेतलेल्या सर्व नवोगत विद्यार्थी- विद्यार्थिनींचे गुलाबपुष्प व गोड भेट देऊन स्वागत करण्यात आले.

यावेळी प्रशालेचे प्राचार्य श्री. अशोक साखरे यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात कै. आदरणीय पंचप्पा कल्याणशेट्टी सर यांनी या हन्नूर पंचक्रोशीतील विद्यार्थ्यांच्या महाविद्यालयीन शिक्षणाची सोय व्हावी याकरिता हे कनिष्ठ महाविद्यालय सुरू केले.विशेषत: दहावीनंतर मुलींची होणारी महाविद्यालयीन शिक्षणाची गळती थांबावी हे

यामागचे त्यांचे प्रमुख उद्दिष्ट होते शहरात जाऊन शिकाव्या लागणाऱ्या विद्यार्थ्यांची गावातच सोय करून अनाठायी होणाऱ्या खर्चापासून वाचवले तेंव्हा त्याचा सदुपयोग करून घ्या. एवढेच नव्हे तर कला शाखेला कमी न लेखता, याविषयी कोणत्याही प्रकारचा न्यूनगंड मनी न बाळगता प्रयत्नशील राहिल्यास यश निश्चितच आपल्या पायाशी लोळण घेईल असे सांगून सर्व नवोगत विद्यार्थ्यांचे संस्थेच्या व महाविद्यालयाच्यावतीने स्वागत करुन शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.यावेळी प्रशालेचे पर्यवेक्षक श्री.ज्ञानदेव शिंदे,सांस्कृतिक विभाग प्रमुख श्री.अप्पासाहेब काळे, जेष्ठ शिक्षक श्री.सरदार मत्तेखाने, श्री.शशिकांतअंकलगे, शिक्षिका सौ.मृदुलादेवी स्वामी, सौ. स्वप्नाली जमदाडे, कलाशिक्षक राजेंद्र यंदे श्री.अब्दुलअझीझ मुल्ला उपस्थित होते.



या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. काशीनाथ पाटील यांनी केले तर आभार प्रा. रवींद्र कालीबत्ते यांनी मानले. आजच्या प्रशालेतील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या स्वागत कार्यक्रमाचे संस्थेचे अध्यक्ष व आमदार मा. श्री. सचिनदादा कल्याणशेट्टी, संस्थेचे जेष्ठ संचालक व मार्गदर्शक श्री. मल्लिनाथ कल्याणशेट्टी, प्रशालेचे माजी प्राचार्य व आधारस्तंभ श्री. सिद्धेश्वर कल्याणशेट्टी, संचालिका सौ. शांभवीताई कल्याणशेट्टी, हन्नूरचे उपसरपंच व युवा नेते श्री. सागरदादा कल्याणशेट्टी, संचालक श्री. मल्लिकार्जुन मसुती,सी.ई.ओ.सौ. रुपाली शहा, विज्ञान विभाग प्रमुख सौ. पुनम कोकळगी यांनी कौतुकासह अभिनंदन केले.

# खामगाव येथील एका दलित मागासवर्गीय तरुणास मारहाण प्रकरणाचा नळदुर्ग येथे रिपाइं (आठवले) च्या वतीने जाहीर निषेध : आरोपीवर मोक्का अंतर्गत कडक कारवाई करणाची केली मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के. गायकवाड : बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव येथे गाय चोरल्याचे कारण पुढे करुन बसस्थानकावरून एका मागासवर्गीय बौद्ध तरुणाचे अपहरण करून त्याला विवस्त्र करून अमानूषपणे बेदम मारहाण केली.त्या मारहाणीत त्याचा एक डोळ निकामी झाल्याची निंदनीय घटना घडली असून या निंदनीय घटनेचा नळदुर्ग ता. तुळजापूर येथे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाच्या वतीने व दलित पँथर धाराशिव जिल्हा शाखेच्या वतीने जाहीर निषेध करून या घटनेतील आरोपीना तात्काळ अटक करून त्यांच्यावर मोक्का कायद्यानुसार कडक कारवाई करावी अशी



मागणी नळदुर्ग येथील अप्पर तहसिलदार मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांच्या कडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

या संदर्भात रिपाइं (आठवले) नळदुर्ग शहर शाखेच्या वतीने व दलित पँथरच्या वतीने देण्यात आलेल्या लेखी निवेदनात म्हटले आहे की नुकतयच खामगाव जिल्हा बुलढाना येथील मागासवर्गीय बौध्द समाजातील २४ वर्षीय तरुण रोहन पैठनकर याला खामगाव येथील बस स्थानक परिसरातून अपहरण करून येथील गावगुंड गब्बु गुजरीवाल, रोहीत पगारीया, प्रशांत संगेल या तिघानी बाजुला मैदानात घेवून गेले व गाय चोरीचा आरोप करून त्याला विवस्त्र करून कायदा हातात घेवून बेदम मारहाण केली.या मारहाणीत रोहन पैठनकर यांचा एक डोळा निकामी झाला. ही घटनाचं मानवतेला काळीमा फासणारी असून निंदनिय आहे या निंदणीय घटनेचा रिपाइं(आठवले) च्या वतीने जाहीर निषेध करण्यात येत असून या घटनेतील फरार आरोपीस तात्काळ अटक करून वरिल तिनीही आरोपीवर मोक्का अंतर्गत कारवाई करावी अन्यथा या संर्भात तिव्र आंदोलन करण्यात येईल असा लेखी इशारा ही देण्यात आला आहे.



यावेळी अप्पार तहसिलदार यांचे प्रतिनिधी म्हणून महसुल सुहाय्यक समाधान पोथरे यांच्या उपस्थिती मंडळ अधिकारी डी.एम. कांबळे यानी निवेदन स्विकारले.या निवेदनाची एक प्रत माहितीस्तव नळदुर्ग पोलीस ठाण्याले सपोनी नांगरे याना ही देण्यातआली आहे..

याप्रसंगी देण्यात आलेल्या निवेदनावर रिपाइं (आठवले) चे जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब बनसोडे, जिल्हा सचिव एस.के. गायकवाड, रिपाइं तुळजापूर तालुका अध्यक्ष अरुण लोखंडे, नळदुर्ग शहराध्यक्ष मारुती खारवे, दलित पँथरचे जिल्ह संपर्क प्रमुख शामकांत नागीले,रिपाइं (आठवले) चे नळदुर्ग सर्कल प्रमुख राजेंद्र शिंदे, रिपाइं अल्पसंख्यांक आघाडीचे तालुका अध्यक्ष बाशिदभाई कुरेशी, रिपाइंचे तालूका संघटक सुरेश लोंढे, संघटन सचिव दत्ता बनसोडे, येडोळ शाखा अध्यक्ष देवानंद लोंढे, उपाध्यक्ष मारुती लोंढे, रिपाइं जळकोट शाखा अध्यक्ष आरविंद लोखंडे, सामाजिक कार्यकर्ते कैलास गवळी गुरुजी, रावसाहेब वाघमारे,सह कार्यकार्यांच्या सह्या आहेत.

# साई पारायण सेवा आणि श्रद्धेचा संगम: डॉ. सुजय विखे पाटील

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

शिर्डी (प्रतिनिधी) : शिर्डी येथे सुरू असलेल्या साई सच्चरित पारायण सोहळ्याला डॉ. सुजय विखे पाटील यांनी भेट दिली. १००० रूमजवळ भक्तिमय वातावरणात पारायणाचे भव्य आयोजन करण्यात आले होते. या पवित्र सोहळ्यात त्यांनी साई महाराजांचे प्रवचन करणाऱ्या पूज्य महाराजांचे मनोभावे दर्शन घेतले.

या पारायण सोहळ्याचे आयोजन श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, नाट्य रसिक मंच शिर्डी व स्थानिक ग्रामस्थांच्या सहकार्याने करण्यात आले असून, ही सामूहिक




सेवा आणि श्रद्धेची एक सुंदर अभिव्यक्ती आहे, असे मत डॉ. विखे पाटील यांनी यावेळी व्यक्त.

डॉ. विखे पाटील यांनी भाविक भक्तांसमवेत भारतीय बैठक लावून प्रसाद ग्रहण करताना, या क्षणाला सेवा आणि श्रद्धेचा संगम असे सांगितले. यावेळी विखे पाटील परिवाराच्या वतीने पारायण सोहळ्यासाठी एक लाख रुपयांची देणगी आयोजक समितीकडे सुपूर्त करण्यात आली.

यावेळी डॉ. विखे पाटील यांनी ऑक्टोबर महिन्यात शिर्डीत होणाऱ्या प्रदीप मिश्रा महाराज यांच्या आगामी कार्यक्रमाची रूपरेषा लवकरच जाहीर होईल, अशी माहिती देखील दिली. तसेच त्यांनी आग्रहाने आवाहन केले की, या पावन कार्यासाठी स्वयंसेवक म्हणून काम करण्याची इच्छा असलेल्या स्वयंसेवकांनी आमच्याशी संपर्क साधावा.

या पवित्र पारायण सोहळ्यात हजारो भाविकांनी भक्तिभावाने सहभाग दर्शविल्याने परिसर अतिशय भक्तिमय, ऊर्जा आणि एकात्मतेने भारलेला दिसत होता. श्री साई बाबांच्या चरणी मन मोकळं करणाऱ्या या सोहळ्याने प्रत्येकाच्या हृदयात अनमोल स्मृती आणि नवचैतन्य पसरवले. यावेळी अभय शेळके पाटील, भाजपा अध्यक्ष रवींद्र गोंदकर, ताराचंद कोते तसेच शिर्डी ग्रामस्थ आणि भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कोणत्याही देशाने ऑपरेशन सिंदूर रोखले नाही

(पान १ वरून..) हाजिपीर पास भारतीय सैन्याने ताब्यात घेतलं होतं. पण काँग्रेसने ते पुन्हा पाकिस्तानच्या ताब्यात दिलं. १९७१ मध्ये पाकिस्तानचे ९१ हजार सैन्य भारताच्या ताब्यात होते. पाकिस्तानची मोठी जमीन भारताच्या ताब्यात होती. भारत विजयाच्या स्थितीत होता. त्यावेळी जरासा प्रयत्न केला असता तर त्याचवेळी पाकव्याप्त काश्मीर ताब्यात घेतलं असतं. किमान कर्तारपूर साहिब कॉरिडॉर तरी भारताने ताब्यात घ्यायला हवा होता. सियाचिनमधून भारतीय सैन्य मागे घेण्यासंबंधी काँग्रेस प्रयत्नशील होतं. भारतीयांनी त्यांना सत्ता दिली नाही, नाहीतर सियाचिनही भारताच्या ताब्यात नसतं. २६११ च्या हल्ल्यानंतरही काँग्रेसने पाकिस्तानसोबत बोलणी सुरू केली, त्यांच्यासोबत व्यापार सुरू केला. पण आम्ही पाकिस्तानचा व्हिसा बंद केला, अटारी वाघा बॉर्डर बंद केली.

**सिंधू नदीच्या पाण्यावर पाकिस्तान मौजमजा करतोय**

सिंधू पाणी वाटप करार काँग्रेसने केला, नेहरूंनी केला. भारतातून वाहणाऱ्या पाण्याचा करार करण्यात आला. हजारो वर्षांपासून भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट असलेल्या नद्यांच्या पाण्यावर नेहरु आणि काँग्रेसने पाकिस्तानसोबत करार केला. त्यामध्ये जागतिक बँकेला मध्यस्ती करण्यास सांगितलं. पाणी आमचं आणि निर्णय जागतिक बँक करणार? भारतातून वाहणाऱ्या ८० टक्के पाण्यावर पाकिस्तानला अधिकार दिला आणि एवढ्या मोठ्या भारताला फक्त २० टक्के पाणी ठेवलं. जो देश भारतावर हल्ला करतोय, दहशतवाद पसरवतोय त्याला ८० टक्के पाणी दिलं. या पाण्यावर पाकिस्तान मौजमजा करतोय. जर हा करार केला नसता तर या नद्यांवर अनेक मोठे प्रकल्प निर्माण करता येऊ शकले असते. नेहरू एवढ्यावरच थांबले नाहीत तर त्यांनी पाकिस्तानला कोट्यवधी रुपये दिले. नेहरुंनी पाकिस्तानच्या सांगण्यावरून एक अट स्वीकारली. सिंधू नदीवरील बांधामध्ये जी माती साचली जाते ते भारत स्वच्छ करु शकणार नाही. पाकिस्तानच्या मर्जीशिवाय भारत काहीही करु शकणार नाही ही अट नेहरुंनी मान्य केली. नेहरूंनी केलेला हा सर्वात मोठा ब्लंडर आता भारताने सुधारला आहे. देशाचे अहित ज्यामध्ये आहे तो सिंधू करार आता रद्द करण्यात आला आहे. रक्त आणि पाणी एकत्र वाहू शकत नाही.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# रिपब्लिकन पक्षाच्या महाराष्ट्र राज्य कार्यकारिणीची २ ऑगस्ट रोजी महत्वपूर्ण बैठक

## केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले मार्गदर्शन करणार राजाभाऊ सरवदे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाच्या महाराष्ट्र राज्य कार्यकारिणी ची महत्वपूर्ण बैठक येत्या शनिवार दिनांक २ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी २ वाजता यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मंत्रालया समोर मुंबई येथे आयोजित करण्यात आली असून या बैठकीच्या अध्यक्षस्थानी रिपब्लिकन पक्षाचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष राजाभाऊ सरवदे असून रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले हे या बैठकीस प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहेत. रिपब्लिकन पक्षाच्या महाराष्ट्र राज्य कार्यकारिणी च्या बैठकीस रिपब्लिकन पक्षाच्या महाराष्ट्र राज्य कार्यकारिणी चे पदाधिकारी; सर्व विभागीय अध्यक्ष आणि राज्यातील सर्व जिल्हा अध्यक्षांनी या महत्वपूर्ण बैठकीस उपस्थित राहण्याचे आवाहन रिपाइं चे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांनी केले आहे.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणि रिपब्लिकन पक्षाची राज्यभरातील सदस्यता मोहिमेचा आढावा रिपब्लिकन पक्षाच्या या महाराष्ट्र राज्य कार्यकारिणी च्या बैठकीत घेण्यात येणार आहे.राज्यातील राजकीय घडामोडी पाहता आगामी मुंबई महापालिका निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाची भूमिका महत्वाची ठरणे असून त्याबाबत रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना रामदास आठवले काय निर्णय घेतात याकडे संपूर्ण लक्ष लागले असल्यामुळे रिपब्लिकन पक्षाच्या या राज्य कार्यकारिणी बैठकीला महत्व प्राप्त झाले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाच्या भूमिकेबाबत पक्षाध्यक्ष ना. रामदास आठवले पदाधिकाऱ्यांना महत्वपूर्ण मार्गदर्शन करणार आहेत.त्यामुळे या बैठकीस रिपब्लिकन पक्षाच्या राज्यभरातील जिल्हा अध्यक्ष आणि राज्य कमिटी च्या सर्व पदाधिकाऱ्यांना उपस्थित राहण्याचे आवाहन रिपब्लिकन पक्षाचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांनी केले आहे.

## थोडक्यात...




### घराचा कडी-कोंयडा उघडून ३७ हजाराचे वायरचे बंडल लंपास

सोलापूर, (प्रतिनिधी) : घराचा कडी कोंयडा लावलेला असताना अज्ञात चोरट्याने कडी कोंयडा उघडून फिर्यादी यांचे नजर चुकून घरातील ३७ हजार रुपये किमतीचे पॉली कॅम्ब वायरचे बंडल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना १७ ते २७ जुलैदरम्यान साठे शिंदे वस्ती डोणगाव रोड येथे घडली. याप्रकरणी तुषार तानाजी कोकरे (वय-१९,रा.साठे शिंदे वस्ती,डोणगाव रोड) यांनी सलगर वस्ती पोलीस ठाणे फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार कुंभार हे करीत आहेत.

### निष्काळजीपणाने वाहन चालवून दिली धडक; चार चाकी वाहन चालकावर गुन्हा

सोलापूर, (प्रतिनिधी) : निष्काळाचीपणाने वाहन चालवून रिक्षाला धडक देऊन रिक्षाचे पन्नास हजारांचे नुकसान केल्याप्रकरणी अज्ञात चार चाकी वाहन चालकाविरुद्ध सलगर वस्ती पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना २५ जुलै रोजी रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास वानकर वस्ती येथे घडली. याप्रकरणी चंद्रकांत गोरख खुर्द (वय-५३,रा.आयेध्या नगर सैफुल विजापूर रोड यांनी सलगर वस्ती पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चारचाकी वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, फिर्यादी हे त्यांच्या ताब्यातील रिक्षा क्रमांक एमएच.१३.एएफ.२३३४ ही रिक्षा यु टर्न घेत असताना अज्ञात चालकाने त्यांच्या ताब्यातील चार चाकी वाहन क्रमांक एमएच.१३.ईएस.०२१२ निष्काळजीपणाने चालून फिर्यादी यांच्या रिक्षात धडक देऊन फिर्यादी व रिक्षात बसलेल्या सरिता सोमनाथ क्षीरसागर व तसेच मनीषा क्षीरसागर यांना गंभीर जखमी केले. तसेच फिर्यादी यांच्या रिक्षाचे पन्नास हजार रुपयांचे नुकसान केले आहे.असे फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास पोलीस हवालदार उपासे हे करीत आहेत.

# जलसंपदा मंत्री मा. राधाकृष्ण विखे पाटील यांना निरा देवधर पाणी प्रश्नासंदर्भात निवेदन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : जलसंपदा मंत्री मा राधाकृष्ण विखे पाटील साहेब यांना माळशिरस मतदारसंघातील निरा देवधर पाणी प्रश्न संदर्भात आज निवेदन दिले. यावेळी त्यांच्याशी सविस्तर चर्चा करत माळशिरस तालुक्यातील शेतीसाठी पाणी नियोजन, व बंधाऱ्याची दुरुस्ती व पाणी प्रश्नावर तातडीने काम सुरू करण्याची मागणी केली. यावेळी मा.मंत्री महोदयांनी शेतकऱ्यांच्या अडचणी समजावून घेऊन सकारात्मक प्रतिसाद दिला.

माळशिरस तालुक्यातील प्रत्येक शेतकऱ्याला पाणी मिळावे, शेती समृद्ध व्हावी आणि बंधारे सशक्त व्हावेत यासाठी मी सातत्याने प्रयत्नशील आहे माळशिरस सर्वांगीण विकासासाठी मी कटिबद्ध असून शेतकऱ्यांना हितासाठी लढत राहणार आहे. याप्रसंगी माजी खासदार रणजीत सिंह नाईक निंबाळकर, आणि फलटण मतदारसंघाचे आमदार सचिनजी पाटील उपस्थित होते. माजी आमदार राम सातपुते हेही उपस्थित होते.

# पत्रकार एस. के. गायकवाड, लहुजी शक्ती सेनेचे शिवाजी गायकवाड पत्रकार संपादक दादासाहेब बनसोडे यांना आदर्श समाजसेवा पुरस्कार जाहीर





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : नळदुर्ग परिसरातील उपेक्षित वंचित , पिडीत, शोषीत, व सर्व सामान्य जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्नशील आणि अग्रेसर आहात आपण सामाजिकदृष्ट्या धार्मिकतेचा किंवा सांस्कृतिकदृष्ट्या या सर्व कार्याची दखल घेत आसतात सर्वांच्या दुःखात आणि सुखाच्या सहभाग घेऊन गरीब कुटुंबामध्ये आत्मविश्वास निर्माण केला आहे या सर्व गोष्टींचा विचार करून संत तुकाराम सामाजिक संस्था बाभळगाव व संभव प्रतिष्ठान केशेगाव यांच्या संयुक्त विद्यमाने रि पा इं चे जिल्हा सचिव तथा पत्रकार एस के गायकवाड, लहुजी शक्ती सेनचे नेते शिवाजी गायकवाड, पत्रकार तथा संपादक दादासाहेब बनसोडे यांना आदर्श समाजसेवा पुरस्कार जाहीर झाला आहे.

हा पुरस्कार संत तुकाराम सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष दयानंद काळुंके व संभव प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष तुकाराम क्षिरसागर यांनी झाहीर केल्याचे पत्र संबधीत पुरस्कार्थींना देण्यात आले आहे.

या आदर्श समाजसेवा पुरस्कार जाहीर झाल्यामुळे सर्वत्र अभिनंदन व कौतुक होत आहे.

# लातूरचे सुपुत्र सय्यद शमशोद्दीन यांना भारत गौरव सन्मान पुरस्कार प्राप्त




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लातूर प्रतिनिधी/सुधाकर रणदिवे : पुण्यात 'रंग श्रावणाचा - भारत गौरव सन्मान सोहळा २०२५' उत्साहात पार पडला, हिरकणी महिला विकास संस्था अध्यक्षा सौ. शर्मिला नलावडे व 'विसावा फाउंडेशन' यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्रातील विविध क्षेत्रांतील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांचा या सोहळ्यात गौरव करण्यात आला.

या वर्षीच्या पुरस्कारप्राप्त मान्यवरांमध्ये लातूर जिल्ह्याचे सुपुत्र सुफी सय्यद शमशोद्दीन यांचा विशेष उल्लेख करावा लागेल. गेल्या तीन दशकांपासून सातत्याने सामाजिक कार्यात योगदान देणाऱ्या शमशोद्दीन यांना 'भारत गौरव सन्मान' देऊन गौरवण्यात आले.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून श्री. तेजस बर्वे (संत ज्ञानेश्वरांचे 'मुक्ताई' चित्रपटातील प्रमुख भूमिका), प्रकाश दिंडले (अभिनेते व दिग्दर्शक), दिलीप घेवंदे (स्टार प्रवाह-वरील 'गोष्ट प्रेमाची' मालिकेतील अभिनेता) तसेच इतर अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. सर्व पुरस्कारार्थींना मानचिन्ह, प्रमाणपत्र व ट्रॉफी देऊन सत्कार करण्यात आला.

**सुफी सय्यद शमशोद्दीन यांचा कार्यप्रवास :**

गेल्या ३० वर्षांहून अधिक काळ लातूर जिल्ह्यात सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय कार्यात सक्रिय असलेल्या शमशोद्दीन यांनी विद्यार्थी संघटना (एस एफ आय , डी वाय एफ आय), शेतकरी संघटना, पोलीस मित्र उपक्रम (२००७ पासून) तसेच दलित चळवळीतील युवा भीम सेनेचे संस्थापक प्रवक्ते म्हणून कार्य केले आहे. सामाजिक समतेसाठी, युवकांच्या सक्षमीकरणासाठी आणि शैक्षणिक प्रबोधनासाठी त्यांनी केलेले कार्य लक्षणीय आहे.

त्यांच्या या सन्मानाबद्दल लातूर जिल्ह्यासह राज्यभरातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, सर्वत्र त्यांचे कौतुक करण्यात येत आहे.

# कार्यशाळेतून शिक्षकांनी घेतले किशोरवयीन जीवन कौशल्याचे धडे




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, मुंबई, जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग, सोलापूर व फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय शालेय शिक्षक व शिक्षिका यांचे किशोरवयीन जीवन कौशल्य शिक्षण कार्यक्रम अंतर्गत प्रशिक्षण शिबिराचे आयोजन फॅमिली प्लॅनिंगच्या भवानी पेठ येथील मुख्य कार्यालयात करण्यात आले होते.

प्रशिक्षण शिबिराच्या प्रमुख पाहुण्या व उद्घाटक म्हणून बालकल्याण समितीच्या ड. सुवर्णा कोकरे या होत्या तर अध्यक्षस्थानी एफ.पी.ए.आय. सोलापूर शाखेचे मार्गदर्शक प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर हे होते.

यावेळी फॅमिली प्लॅनिंग सोलापूर शाखेचे चेअरपर्सन प्रा. डॉ. एन. बी. तेली, व्हाईस चेअरपर्सन प्रा. डॉ. आयेशा रंगरेज, जिल्हा कार्यक्रम अधिकारी कृष्णा सकट, आर.के.एस.के प्रोग्राम कॉर्डिनेटर स्मिता भोसले, ब्रह्मदेव श्रीमंगले, दिनेश राठोड, सुगतरत्न गायकवाड, वीरेंद्र परदेशी आदी उपस्थित होते.

कार्यशाळेत नेताजी सुभाषचंद्र बोस प्रशाला, समाधान माध्यमिक प्रशाला, मल्लिकार्जुन प्रशाला, मेहता प्रशाला, एस.व्ही.सी.एस. हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, इप्पाकायला प्रशाला, सहस्त्रार्जुन प्रशाला, अब्बा प्रशाला, विद्यानिकेतन प्रशाला, नीलकंठेश्वर प्रशाला, चंदेले प्रशाला, असावा प्रशाला, चौडेश्वरी प्रशाला आदी शाळांचे विज्ञान विषयाचे शिक्षक उपस्थित होते.

किशोरवयीन जीवन कौशल्य कार्यक्रमाची ओळख स्मिता भोसले यांनी करून दिली, ड. सुवर्णा कोकरे यांनी पोक्सो कायद्या व तरतुदी आणि सध्यस्थिती वर प्रकाश टाकला, किशोरावस्थाआणि वाढते वय याविषयी एफ.पी.ए आयचे कार्यक्रम अधिकारी वीरेंद्र परदेशी, पौगंडावस्थेतील प्रजननक्षम आणि लैंगिक आरोग्य याविषयी कम्युनिटी मोबिलायझर स्वप्निल सोनवणे यांनी, मानसिक आरोग्य समस्या आणि मादक पदार्थांचा दुरुपयोग याविषयी सारथी युथ फाऊंडेशनचे सचिव रामचंद्र वाघमारे, एच.आय. व्ही. एड्स आणि एस.टी. आय. आर. टी. आय. विषयी जिल्हा सांख्यिकी अधिकारी दिनेश राठोड तर एच.आय.व्ही. प्रतिबंधाकरिता जीवण कौशल्य याविषयी जिल्हा कार्यक्रम अधिकारी कृष्णा सकट यांनी प्रशिक्षणाचे सत्र घेतले.

अध्यक्षीय समारोपात डॉ. येळेगावकर म्हणाले की, आयोजित प्रशिक्षणातून मिळालेल्या शास्त्रीय माहितीचा उपयोग आपल्या दैनंदिन अध्यापनात करावा. विद्यार्थ्यांच्या बदललेल्या स्वभावाचा अभ्यास करावा, त्यांना बोलते करून, समस्या समजून घेऊन त्याचे वेळीच निरसन करावे. विद्यार्थ्यांना मनमोकळे व्हायचे आई-वडीनंतर शिक्षक हाच महत्वाचा घटक आहे.

प्रशिक्षण शिबिराचे सूत्रसंचालन शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड यांनी केले. स्वागत व प्रास्ताविक कृष्णा सकट यांनी केले तर आभार ब्रह्मदेव श्रीमंगले यांनी मानले.

**ग्रामपंचायतचे दुर्लक्ष; ग्रामपंचायत रस्ता दुरुस्तीसाठी प्रयत्नशील नसल्याने ग्रामस्थात संतापाची लाट**

# उत्का पाटी ते उत्का गाव रस्त्याची दुरावस्था

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधी/अमर जाधव : लातूर निलंगा महामार्गावर असलेले उत्का गाव, महामार्गावर उत्का पाटी असुन उत्का गावात जाणाऱ्या रस्त्याची दुरावस्था झाली असून रस्त्यावर खड्डे की खड्यात रस्ता व साचलेल्या गुडघाबर पाण्यातुन विद्यार्थी व ग्रामस्थांना रस्त्यावरुन जिव मुठीत घेत प्रवास करावा लागतोय. उत्का गावातील विद्यार्थी शेतकरी व ग्रामस्थांना या रस्त्यावरुन प्रवास करत असताना अनंत अडचणीचा सामना करुन आपला दैनंदिन प्रवास करावा लागतोय ,ग्रामस्थांनी या रस्त्यासाठी अनेकदा




प्रयत्न करुन ही गेल्या दहा वर्षापासुन प्रलंबित रस्त्याकडे प्रशासनाच व सरकार दुर्लक्ष करत असल्याच उत्का ग्रामस्थांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले. उत्का गावात प्रवेश करतानाच रस्त्यावर भलेमोट्टे खड्डे व खड्यात पावसाचे पाणी साचल्याने वाहनधारकांना खंड्याचा अंदाज न आल्याने अपघात होत असुन शालेय विद्यार्थ्यांना पर्यायी रस्ता खराब झाल्याने ग्रामस्थ संतापल्याचही चित्र पहायला मिळाले.

यावेळी उपसस्थितांनी लवकरात लवकर रस्ता दुरुस्ती करावा अन्यथा उपोषण करण्याचा उत्का ग्रामस्थांनी इशारा दिला आहे.

# अशोकराव पडघान यांचा प्रथम मदतीचा हात समोर



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : चिखली तालुक्यातील भरोसा या गावी कर्जबाजारी सरकारच्या नाकर्तेपणा जुलमी धोरण . सोयाबीन पिकावर हुमणी आळीचे संकट.या सर्व त्रासापासून.भरोसा गावातील शेतकरी पती. पत्नी या दाम्पत्याने . शेतातील झाडाला गळफास घेऊन आत्महत्या करून शेवटचा निर्णय घेतला. खरे तर आत्महत्या करणे हे.कोणत्याच समस्या चे उत्तर अशु शकत नाही. घरातील कर्त्या व्यक्ती ने अशी टोकाची भूमिका घेतल्याने कुटुंबातील सर्व सदस्य दुःखात व आर्थिक संकटात सापडला जातो. अशी गत भरोसा गावातील थुट्टे परीवारातील आत्महत्या ग्रस्त पती पत्नी दाम त्याच्या. परीवारातील आई वडील गेल्याने .मुलाबाळाची गत झाली आहे.अनेक नेते मंडळींनी सांत्वन पर भेटी देऊन मदतीचे आश्वासन दिले आहेत. दुःखात असणारे कुटुंब यांना सावरण्यासाठी आर्थिक मदतीची गरज भासत असताना कोणी च मदत न केल्याने अशोकराव पडघान यांनी त्यांच्याआत्महत्या ग्रस्ता च्या परीवाराला सर्व प्रथम अकरा हजार रूपयांची अर्थीक मदत करून आत्महत्या ग्रस्त परीवारातील कुटुंबियांना धिर दिला . या शेतकरी कुटुंबीयांना होईल तेवढी आर्थिक मदत करावी.

**भरोसा येथील आत्महत्याग्रस्त शेतकरी दाम्पत्यांच्या कुटुंबाला अकरा हजार रूपयांची आर्थिक मदत**

# सैन्याच्या कारवाईला तमाशा संबोधल्याने खासदार प्रणिती शिंदे यांच्या प्रतिमेला मारले जोडे

## ‘ऑपरेशन सिंदूर’ च्या वक्तव्यावरून भाजपा आक्रमक : आमदार देवेंद्र कोठे यांच्या नेतृत्वाखाली भाजपाचे आक्रमक आंदोलन


**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : पहेलगाम हल्लयानंतर भारतीय सैन्यदलाने पाकिस्तानात घुसून केलेल्या ऑपरेशन सिंदूरला खासदार प्रणिती शिंदे यांनी लोकसभेत सोमवारी तमाशा संबोधणे अयोग्य आहे. खासदार प्रणिती शिंदे पात्रता नसताना पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका करतात असा आरोप करीत मंगळवारी भाजपाने खासदार प्रणिती शिंदे यांच्या प्रतिमेला जोडे मारून त्यांचा निषेध केला. आमदार देवेंद्र कोठे यांच्या नेतृत्वाखाली शहर भाजप कार्यालयासमोर हे आंदोलन झाले.

यावेळी गाढवाला खासदार प्रणिती शिंदे यांची प्रतिमा लावण्यात आली होती. प्रणिती शिंदे यांचा धिक्कार असो, भारतमाता की जय, वंदे मातरम, जय भवानी जय शिवराय अशा घोषणा याप्रसंगी देण्यात येत होत्या. आमदार देवेंद्र कोठे म्हणाले, खासदार प्रणिती शिंदे या स्टंट करण्यासाठी प्रसिद्ध आहेत. काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्यासमोर चमकोगिरी करण्यासाठी अशी वक्तव्ये त्या करतात. पहेलगाम येथील हल्लयात अनेक माता-भगिनींच्यासमोर त्यांच्या पतींची हत्या झाली. त्यांचे सिंदूर पुसले गेले. त्यामुळे साहजिकच देशात या विरोधात तीव्र भावना होत्या. पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादी हल्लयाला प्रत्युत्तर म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भारताने पाकिस्तानात घुसून ऑपरेशन सिंदूर राबवले. या ऑपरेशनचे सर्व जगाने कौतुक केले. सर्व पक्षांनीही पक्षीय अभिनिवेश बाजूला ठेवून कारवाईचे समर्थन केले. परंतु सभागृहाचे आणि माध्यमांचे लक्ष वेधून घेण्यासाठी खासदार प्रणिती शिंदे यांनी असे बेताल वक्तव्य केलेले आहे. ज्यांनी खासदार प्रणिती शिंदे यांना लोकसभा निवडणुकीत निवडून दिले, त्यांनाही आता या गोष्टीची लाज वाटत असेल.

खासदार प्रणिती शिंदे यांचे वडील माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनीही हिंदूंना दहशतवादी म्हणत भगवा दहशतवाद शब्द वापरला होता. तसेच अफजलजी, कसाबजी असे चुकीचे शब्दही वापरले होते. परंतु कालांतराने त्यांनी देशाची क्षमाही मागितली. परंतु खासदार प्रणिती शिंदे यांचा स्वभाव पाहता त्यांनी केलेल्या वक्तव्याबद्दल त्या क्षमा मागणार नाहीत. सोलापूरच्या लोकप्रतिनिधीने हे वक्तव्य केलेले आहे. त्यामुळे सोलापूरचे रहिवासी असल्यामुळे आम्ही संपूर्ण सोलापूरकरांच्यावतीने आणि भाजपाच्यावतीने देशाच्या सैन्यदलाची माफी मागत आहोत, असेही आमदार देवेंद्र कोठे याप्रसंगी म्हणाले. संपूर्ण देश शूरवीर सैन्यदलाच्या आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पाठीशी उभा असताना खासदारांनी अशी वक्तव्य करणे निषेधार्ह आहे, अशी टीका आमदार कोठे यांनी यावेळी केली.


लोकप्रतिनिधींनी संसदेत विकासावर बोलणे अपेक्षित आहे. खासदार प्रणिती शिंदे यापूर्वी तीन वेळा आमदार राहिलेल्या आहेत आणि आता खासदार आहेत. गेल्या वर्षभरात त्यांनी केलेले एकही काम दाखवलेले नाही. वर्षभरात त्यांनी किती निधी आणला हे त्यांनी जनतेसमोर सांगितलेले नाही. परंतु भारतीय सैन्याने केलेल्या कारवाईला तमाशा संबोधण्याचे त्यांचे वक्तव्य गाढवापेक्षाही पुढच्या अकलीचे आहे. आमचा तमाशा या शब्दावर तीव्र आक्षेप आहे. त्यामुळे गाढवाला त्यांची प्रतिमा लावून आम्ही निषेध नोंदवला आहे, असेही आमदार देवेंद्र कोठे यांनी याप्रसंगी सांगितले.




यावेळी आमदार देवेंद्र कोठे, माजी महापौर श्रीकांचना यन्नम, माजी शहराध्यक्ष रामचंद्र जन्नू, रंजिता चाकोते, संगीता खंदारे, लक्ष्मी बदलापुरे, माजी नगरसेवक राजकुमार हंचाटे, देवेंद्र भंडारे, मेघनाथ येमूल, अनिल पल्ली, भरतसिंग बडूरवाले, रवी कोळेकर, रुपेश जक्कल, अंबादास बिंगी, मंडल अध्यक्ष नागेश सरगम, नागेश खरात, बजरंग कुलकर्णी, मनोज कलशेट्टी, श्रीनिवास जोगी, संदीप जाधव, मधुकर वडनाल, विजय कुलथे, दत्तात्रय पोसा, आनंद बिर्रू, रामदास मगर, शिवा कामाठी, अभिषेक चिंता, यशवंत पाथरूट, संदीप ढगे, बंटी क्षीरसागर, गणेश साळुंखे, सागर अतनुरे, सतीश तमशेट्टी, सिद्धेश्वर कमटम, अंबादास सकीनाल आदी उपस्थित होते

---

## नागपंचमी निमित्त श्री रूक्मिणी मातेस अलंकार परिधान



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोने मुकुट, वाक्या जोड, तोडे जोड, तानवड जोड, चिंचपेटी तांबडी, जवमणी पदक, जवेच्या माळा, लक्ष्मीहार, मोहरांची माळ, पुतळ्याची माळ, हायकोल, सरी, कंबरपट्टा इत्यादी.

---

## घराच्या बांधकामावरील साहित्य पळवले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर, (प्रतिनिधी) : घराचे बांधकाम चालू असताना अज्ञात चोरट्याने साडेपाच हजार रुपये किमतीचे घराचे बांधकाम साहित्य पैकी ८० किलो वजनाचे लोखंडी सळईचे तुकडे चोरून नेल्याची फिर्याद अनिल हरिश्चंद्र उपरे (रा.भाग्योदय सोसायटी,नई जिंदगी) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. ही घटना २७ जुलै रोजी सकाळी सव्वा अकरा वाजण्याच्या दरम्यान नई जिंदगी येथे घडली. या घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार भिसे हे करीत आहेत.

---

## निवृत्ती पारखे यांची साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे मध्यवर्ती जयंती उत्सव समितीचे अध्यक्षपदी निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



अक्कलकोट/प्रतिनिधी : साठे नगर माणिक पेठ अक्कलकोट येथे संपन्न झालेल्या मातंग समाज बैठकीत ज्येष्ठ समाजसेवी निवृत्ती पारखे यांची साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे मध्यवर्ती जयंती उत्सव समिती २०२५ चे अध्यक्ष म्हणून एकमताने निवड करण्यात आली.

उपाध्यक्ष-धनराज कांबळे, सचीव-ताराबाई शिरसागर, खजिनदार-पुतळाबाई शिरसागर सह आदि पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. यावेळी संजय पात्रे, ठकशेन शितोळे, ज्योतिबा पारखे, विशाल ठोंबरे विकी देडे, संतोष पारखे, महपती शिरसागर,अंबादास कांबळे, राहुल शिरसागर, बळी देडे, पारूबाई वाघमारे, सागराबाई देड, स्वामीनाथ पात्रे, अंबादास शितोळे, दिगंबर शिरसागर आदिसह समाज बांधव भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

## इंदापूरच्या आश्रमशाळेतील कु. प्रिती विटकरला मिळाली इस्त्रो भेटीची संधी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे : इंदापूर ता.२९ : इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या खाजगी विजाभज प्रवर्गाच्या उच्च माध्यमिक निवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना इस्त्रो ( भारतीय अंतराळ संशोधन (संस्था)या संस्थेस भेट देण्यासाठी पुणे विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांची निवड करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याच्या मुख्यालयी एका ठिकाणी चाचणी परीक्षा (दि.२७) घेण्यात आल्या.



पुणे जिल्ह्यात मुखई ता.शिरुर येथे घेण्यात आलेल्या चाचणी परीक्षेत मातोश्री रमाबाई आंबेडकर विद्यार्थी वसतिगृह ट्रस्टच्या अंकित असणाऱ्या राजमाता अहिल्याबाई होळकर निवासी उच्च माध्यमिक आश्रम शाळेची कु. प्रीती सुरेश विटकर (अकरावी विज्ञान) ही उत्तीर्ण झाली. पुणे विभागाच्या गुणवत्ता यादीत निवड झाल्याने तिची इस्त्रो भेटीसाठी निवड झाली आहे.

शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा शकुंतला (काकी) मखरे, सचिव ड. समीर मखरे व प्राचार्या अनिता साळवे यांनी कु. प्रिती विटकरचे अभिनंदन करुन इस्त्रो या संस्थेस भेटीसाठी शुभेच्छा दिल्या.

कु.प्रिती विटकरचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे.

---

## नारायण चिंचोली येथे भावार्थ रामायण सुरू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पंढरपूर तुक्यातील नारायण चिंचोली येथे भावार्थ रामायण सुरू झाले असल्याची माहिती भारतीय जनता पार्टी राज्य परिषदेचे सदस्य लक्ष्मण धनवडे, व नारायण चिंचोली चे उपसरपंच गहिनीनाथ चव्हाण यांनी दिली आहे.

नारायण चिंचोली येथे मोठ्या भक्ती भावाने भावार्थ रामायण श्रावण महिन्याचे औचित्य साधत सुरू झाले असून दिंडीची विधिवत पूजा पुजारी गणेश आवताडे यांच्या हस्ते करण्यात आली.

हा उत्सव सुमारे सहा महिने सुरू राहणार असून दररोज विविध प्रकारचे धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती सूर्यनारायण देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष प्राध्यापक दत्तात्रय मस्के यांनी दिली.

भावार्थ रामायण दरम्यान गावामध्ये दररोज रात्री ग्रंथ वाचन होणार असून पहाटे पाच वाजता गावाच्या संपूर्ण मुख्य रस्त्यावरून रामफेरी निघणार आहे तरी या भावार्थ रामायनासाठी गावातील राम भक्तानी दररोज मोठ्या भक्ती भावाने उपस्थित राहावे असे आव्हान नारायण चिंचोली राम भक्त व ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.




---

**महाराष्ट्र असोसिएशन कैनॉइंग व कायकिंग आयोजित १६ व्या राज्यस्तरीय कॅनो स्प्रिंट व ड्रॅगन बोट अजिंक्यपद स्पर्धा**

# राज्यस्तरीय कैनॉइंग व कायकिंग स्पर्धेत कर्मवीर गणपत दादा मोरे निफाड महाविद्यालय बोटक्लबने पटकावली ३२ पदके




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : महाराष्ट्र असोसिएशन कैनॉइंग व कायकिंग आयोजित १६ व्या राज्यस्तरीय कॅनो स्प्रिंट व ड्रॅगन बोट अजिंक्यपद २०२५ (खुला गट पुरुष व महिला) या स्पर्धा बिरनाळ तलाव ,जत, सांगली येथे नुकत्याच संपन्न झाल्या.

या राज्यस्तरीय स्पर्धेत मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे निफाड येथील कर्मवीर गणपत दादा मोरे कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाच्या बोट क्लबच्या खेळाडूंनी वैयक्तिक व सांघिक प्रकारात यशस्वी सहभागी घेवून उत्कृष्ट कामगिरी करत कॅनॉइंग, कयाकिंग व ड्रॅगन बोट या क्रीडा प्रकारात घवघवीत यश संपादन केले असून, ११ सुवर्ण, ११ रौप्य व १० कांस्य, असे एकूण ३२ पदकांची दणदणीत कमाई केली आहे.

ड्रॅगनबोट क्रीडा प्रकारात ऋतुजा शिंदे हिने २ सुवर्ण आणि २ ब्राँझ, तर आदित्य राऊत याने १ सुवर्ण व १ रौप्य, के-४, १,००० मीटर प्रकारात कु. साक्षी मोगल, सनिका मुलानी, नेहा शिंदे, मिजबा मुलानी यांना सुवर्ण, के-२, १,००० मीटर प्रकारात कु. साक्षी मोगल, सानिक सोनवणे यांना रौप्य, के-२, २०० मीटर प्रकारात कुणाल खापरे, साक्षी शिंदे यांना रौप्य, ड्रॅगन बोट ५०० मीटर प्रकारात कु. साक्षी मोगल, सानिका सोनवणे, नेहा शिंदे, मीजबा मुलाणी यांना सुवर्ण, ड्रॅगन बोट १,००० मीटर प्रकारात कु. साक्षी मोगल, सनीका सोनवणे, नेहा शिंदे, मिजबा मुलाणी यांना बाँझ, ड्रॅगन बोट ५०० मीटर प्रकारात कु. साक्षी मोगल, मिजबा मुलाणी यांना रौप्य, के - ४, २०० मीटर प्रकारात विशाल घोलप, भूषण आव्हाड, कुणाल खापरे, प्रथमेश शिंदे यांना रौप्य, ड्रॅगन बोट २०० मीटर प्रकारात कु. साक्षी मोगल, सानीका सोनवणे, नेहा शिंदे, मिजबा मुलाणी यांना ब्राँझ पदक मिळाले.

यशस्वी खेळाडूंना प्रशिक्षक प्रा चंद्रशेखर मोरे, प्रवीण शेळके, प्रा चेतन कुंदे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

या याबद्दल मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सरचिटणीस अॅड. नितीन ठाकरे यांच्या शुभहस्ते खेळाडूंचा सत्कार करण्यात आला.

**कर्मवीर गणपत दादा मोरे निफाड महाविद्यालयाची शैक्षणिक प्रगती बरोबरच, बोट क्लब (नौकायान) कायकींग आणि कॅनोईंग या क्रीडा प्रकाराच्या माध्यमातून सक्षम खेळाडू तयार करत आहे. अनेक विद्यार्थ्यांना या माध्यमातून सरकारी नोकरीची दारे खुली झाली आहे या गोष्टीची प्रेरणा परिसरातील सर्व विद्यार्थ्यांनी घ्यावी.**

**– मविप्र सभापती बाळासाहेब क्षीरसागर**

**मविप्र समाज संस्थेचे निफाड महाविद्यालय, केटीएचएम महाविद्यालय, पिंपळगाव आणि सायखेडा महाविद्यालय येथील बोट क्लबचे खेळाडू नौकायान या क्रीडा प्रकारात राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर नेत्रदीपक यश मिळवून एक दबदबा निर्माण करत आहे, ही निश्चितच अभिमानास्पद कामगिरी आहे.**

**– मविप्र सरचिटणीस अॅड. नितीन ठाकरे**

या यशाबद्दल मविप्र सभापती बाळासाहेब क्षीरसागर, उपसभापती देवराम मोगल, अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले, उपाध्यक्ष , विश्वासराव मोरे, चिटणीस दिलीप दळवी, संचालक शिवाजी गडाख, महिला संचालिका सौ. शोभाताई भागवत बोरस्ते, शिक्षणाधिकारी डॉ. नितिन जाधव, डॉ. उत्तम डेर्ले, प्राचार्य डॉ. ज्ञानोबा ढगे, महाविद्यालय विकास आणि शालेय व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य, प्राध्यापक यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

**नौकानयन या खेळात महाविद्यालयाने आपले वर्चस्व सिद्ध केले आहे.या क्रीडा प्रकारा बरोबरच सॉफ्टबॉल, खो-खो, कबड्डी,उंच उडी, लांब उडी, बास्केटबॉल, बॅडमिंटन, हॉकी आदी क्रीडा प्रकारातील खेळाडू तयार करीत असून विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभागी व्हावे.**

**– प्राचार्य डॉ ज्ञानोबा ढगे**